
पतझड
ज्योती जोशी

Saprem Namaskar,

I am very happy to tell you that recently I published a book in Marathi-"Patzad".

The book is for sale $10.00. The proceeds will go to a charity in India-(Clean Water).

If you would like to buy this book, please let me know.

Please feel free to tell your friends about it.

Please give me your valuable abhipray when you read my book.

Love, Joy and Peace,

Jyoti

jyotijoshi@comcast.net
508-622-0240




**ज्योती जोशी**
**बॉस्टन**


चव्वेचाळीस वर्षांपूर्वी झालेली मायभूमीची ताटातूट. मग अमेरिकेच्या मातीशी आपसूक जडलेले नाते! त्यावेळेपासूनच मनाचे कंगोरे आणि भेगांमधून निसटलेल्या विचारांचे स्पंदन हृदयाच्या गाभाऱ्यानं घुमू लागले. लेखणीशी जुळलेली मैत्री. त्यातून बाहेर आलेली लिखाणाची झर झर, आईदादांना लिहिलेल्या पत्रांतून प्रकट होऊ लागली. पानांचा सडा पडू लागला.

भारत सोडला तेव्हा मी २० वर्षांची होते. म्हणजे खरं तर मी इथेच माझ्या पायावर उभी रहायला शिकले. या संस्कृतीनेही मला अत्यंत चांगले संस्कार दिले. त्यामुळेच अमेरिकेच्या मातीत आनंदाने रूजू शकले. येथील जीवनाच्या आरशात जेव्हा प्रतिबिंबे उमटायला लागली तेव्हा असे लक्षात आलं की, माणसांची जात सगळीकडे सारखीच. शेवटी आपण सगळे एकाच यात्रेचे वाटसरू.

असा हा लिखाणाच्या पानापानांचा प्रवास शेवटी पोहोचला पतझडीत! पण अशा वेळी ह्या प्रवासात, माझी मी नसते. लिहिणारी कोणीतरी दुसरीच असते. मी मात्र निमित्तमात्र.

ही वस्तुस्थिती इतरांबरोबर वाटून घेणं, हे मी माझं नियत कर्म समजते. म्हणून ही सारी धडपड. काही कथा सोडल्यास ह्या पुस्तकातील हरएक क्षण मी स्वत: अनुभवलेला, पचवलेला आहे.


अक्षता
प्रकाशन

₹ २६०/-